लाडक्या ताईला रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.१९ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## आमदार भावना गवळी यांनी बांधली पंतप्रधान मोदींना राखी म्हणाल्या,..मोदी देशातील कोट्यवधी बहिणींचे भाऊ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ नवी दिल्ली**

आज (१९ ऑगस्ट) रक्षाबंधन सण आहे. संपूर्ण महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्राच्या राजकारणातही अनेक भाऊ-बहीण आहेत. हेच भाऊ-बहीण रक्षाबंधन सणाला एकत्र येतात आणि आनंदात हा सण साजरा करतात. याच रक्षाबंधनाच्या सणाला आमदार भावना गवळी यांनी देखील देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना राखी बांधली.



काही दिसांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत माजी खासदार भावना गवळी यांना तिकिट न मिळाल्याने त्यांना विधानपरिषदेच्या निवडणुकीत उमेदवार देण्यात आली होती. त्यात त्यांनी दणदणीत विजय मिळवला होता. त्यामुळे दोन दिवसापूर्वी भावना गवळी या दिल्ली येथे असतांना दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आमदार भावना गवळी यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा हा पवित्र सण साजरा केला.

**मोदी देशातील कोट्यवधी बहिणींचे भाऊ**

बहिण - भावाच्या नात्यातील ऋणानुबंधाचा गोडवा अधिक वृद्धिंगत व्हावा, याकरिता देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना दरवर्षीप्रमाणे यंदा रक्षाबंधनानिमित्त राखी बांधत मी रक्षाबंधन साजरा केला. मी भाऊ म्हणून मोदी यांना राखी बांधेतच, पण ते देशातील करोडो बहिणींचे देखील भाऊ आहेत. देशातील एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या महिलांबद्दल पहिल्यांदा विचार करणारे व्यक्तिमत्व हे नरेंद्र मोदी यांचे आहे. मोदी या महिलांचे भाऊ आणि पिता देखील आहेत. त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे महिलांच्या जीवनात अनेक बदल झाले असल्याने ते आमचे भाऊ आहेत.

**सुप्रिया सुळेंनी भास्कर भगरेंना बांधली राखी**

सुप्रिया सुळे काल (१८ ऑगस्ट) नाशिक दौऱ्यावर आहेत.रात्री उशिरा त्या नाशिकमध्ये पोहोचल्या. नाशिकमध्य पोहोचताच खासदार सुप्रिया सुळे यांनी दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे दोन दिवसांपासून उत्तर महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. राखी पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला चांदवडमध्ये मेळावा झाला. त्यानंतर खासदार भास्कर भगरे यांचे औक्षण करून सुप्रिया सुळे यांनी त्यांना राखी बांधली.

## ....तर त्याच क्षणी मी राजीनामा देईन अन् राजकारणातून निवृत्त होईन : देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

मनोज जरांगे पाटील यांचं माझ्यावर विशेष प्रेम आहे याची मला कल्पना आहे. जर एकनाथ शिंदे यांनी सांगितले, मराठा आरक्षणाकरता त्यांना निर्णय घ्यायचाय, पण त्यांच्या निर्णयामध्ये मी अडथळा आणला असेल. तर मी त्याच क्षणी राजीनामा देईन आणि मी राजकारणाचा सन्यास घेईन असं सर्वात मोठं विधान मराठा आरक्षणावरील आरोपांवरून देवेंद्र फडणवीस यांनी केलेले आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना सगळं काही द्यायचे आहे. मग ते सगेसोयरे असेल, मराठा आरक्षण असेल मात्र देवेंद्र फडणवीस हे त्यांना करू देत नाही असा आरोप मनोज जरांगे पाटलांनी केला. त्यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याचे सगळे अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडे असतात. इतर सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारावर काम करत असतात. एकनाथ शिंदे आणि मी एकत्रित काम करतो. शिंदेंना पूर्ण पाठबळ आणि पाठिंबा माझा आहे. त्यामुळे जरांगेंनी केलेल्या आरोपावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावं. मी मराठा आरक्षणाच्या मध्ये येतोय असं मुख्यमंत्री म्हणाले तर मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून निवृत्त होईन असं त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले.

## डॉक्टर बलात्कार-मर्डर प्रकरणावरून काँग्रेस-टीएमसी आमने सामने

### राहुल गांधींच्या विधानावरून राजकारण तापलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ नवी दिल्ली**

कोलकात्यातील आरजी कर मेडिकल कॉलेजमधील डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणाने जबरदस्त राजकारण पेटले आहे. राहुल गांधी यांनी 'कठुआ ते कोलकाता' विधान करत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर निशाणा साधला होता. यावर तीन दिवसांनंतर, आता तृणमूलनेही राहुल गांधींवर पलटवार केला आहे. टीएमसीने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर निशाणा साधत, राहुल गांधी सिद्धरामय्या यांचा राजीनामा मागणार का? असा सवाल केला आहे.



I.N.D.I.A. ब्लॉकमधील बहुतांश पक्षांनी न्यायाची मागणी करत या प्रकरणात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने उचललेल्या पावलांचे समर्थन केले आहे. मात्र याप्रकरणी राहुल गांधींनी यांनी टीएमसीवर निशाणा साधला आहे. पीडितेला न्याय देण्याऐवजी आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे राहुल गांधी यांनी म्हटे आहे.

कर्नाटकचे राज्यपाल थावर चंद गहलोत यांनी कथित जमीन वाटप घोटाळ्याप्रकरणी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या विरोधात खटला चालवण्यास मंजुरी दिली आहे. हाच धागा पकडत, एका बातमीचा फोटो पोस्ट करत, तृणमूलचे माजी राज्यसभा खासदार कुणाल घोष यांनी एक्सवर लिहिले, 'तर, राहुल गांधी जी, आपण आपल्या मुख्यमंत्र्यांना राजीनामा मागणार का? हा भ्रष्टाचाराचा एक मोठा आरोप आहेत. पश्चिम बंगालमधील घटनेच्या खऱ्या माहितीशिवाय, ममता बॅनर्जी यांनी उचललेल्या पावलांची माहिती नसताना, आपण सोशल मीडियावर भाष्य केले आहे. आता, आपण आपल्या मुख्यमंत्र्यासंदर्भात पावले उचलण्याची कृपा कराला?

**काय म्हणाले होते राहुल गांधी?**

राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले होते, कोलकाता येथे एका ज्युनियर डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या झाल्याच्या संतापजनक घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. ज्याप्रकारे तिच्यासोबत क्रूर आणि अमानवी कृत्य घडले, त्यामुळे डॉक्टर आणि महिला वर्गात असुरक्षिततेचे वातावरण आहे. पीडितेला न्याय देण्याऐवजी आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न, रुग्णालय आणि स्थानिक प्रशासनावर प्रश्न निर्माण करतो. या घटनेने विचार करायला भाग पाडले आहे की, मेडिकल कॉलेजसारख्या ठिकाणी डॉक्टरच सुरक्षित नसतील, तर पालकांनी कुठल्या भरवशावर आपल्या मुलींना बाहेर शिकायला पाठवायचे? निर्भया प्रकरणानंतर बनवलेले कडक कायदेही असे गुन्हे रोखण्यात अयशस्वी का आहेत?

हाथरस ते उन्नाव आणि कठुआ ते कोलकात्यापर्यंत महिलांवरील वाढत्या घटनांवर प्रत्येक पक्षाला आणि प्रत्येक घटकाला एकत्रितपणे गांभीर्याने चर्चा करून ठोस उपाययोजना कराव्या लागतील.असेही राहुल गांधी यांनी म्हटले होते.

## वन नेशन वन इलेक्शनची कल्पना मांडली आणि दुसऱ्या दिवशी तीन राज्यांच्या निवडणुका वेगवेगळ्या तारखा जाहीर केल्या; शरद पवारांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

राज्यातील विधानसभा निवडणूक लांबणीवर पडल्याची चर्चा असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी खोचक शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावला आहे. राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू होते का मला माहित नाही, हा निवडणूक आयोगाला हा प्रश्न असल्याचे पवार म्हणाले.



शरद पवार यांनी आज सांगितले की १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांनी लाल किल्ल्यांवरून वन नेशन वन इलेक्शनची संकल्पना मांडली. याचा अर्थ सगळ्या निवडणुका एकाच वेळी व्हायला हव्यात असा त्यांचा आग्रह होता. मात्र, दुसऱ्या दिवशी तीन राज्यांच्या निवडणुकांसाठी वेगवेगळ्या तारखा जाहीर करण्यात आल्या अशी खोचक टीका शरद पवार यांनी केली. ते म्हणाले की याचा अर्थ असाच आहे की त्यांना फारच महत्त्व द्यायचे कारण नाही. पंतप्रधान बोलतात एक आणि यंत्रणा दुसराच निर्णय घेते याची प्रचिती आल्याचे शरद पवार म्हणाले.

दरम्यान लडकी बहीण योजनेवरून बोलताना शरद पवार यांनी लाडक्या बहिणीचा विषया फक्त आपल्या राज्यातील आहे इतर चार राज्यांमधील हा विषय नसल्याचे सांगितले. सरकारकडून छोट्या योजना राबवले जात आहेत त्यासाठी तरतूद नसल्याकडे शरद पवार यांनी लक्ष वेधले. मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी यासंबंधी भूमिका मांडतील असेही ते म्हणाले.

**त्यांच्या मनात नक्की काय आहे हे मला माहीत नाही**

नवाब मलिक यांनी राजकीय भूमिका स्पष्ट केल्याची चर्चा आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी सोशल मीडियावर घड्याळ चिन्हाचा वापर सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर विचारण्यात आलं असता ते म्हणाले की बघूया आता पुढे काय होते असं म्हणत त्यांनी मोजक्याच शब्दात प्रतिक्रिया दिली. दरम्यान, अजित पवारांच्या बारामतीमधून निवडणूक न लढवण्याच्या भूमिकेवर बोलताना शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की त्यांना आपला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यांना अनुकूल वातावरण असेल तिथून ते लढतील. त्यांच्या मनात नक्की काय आहे हे मला माहीत नसल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

## वारंवार भाजपला बोलणं मला मान्य नाही; शिंदेंशी बोलणार

### चव्हाण-कदमांच्या वादात फडणवीसांची एन्ट्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही बाजूने मुख्य तीन-तीन पक्ष रिंगणात आहेत. त्यामुळे अनेकदा अनेक नेत्यांच्या वक्तव्यांवरून राजकारण तापतं. अशातच शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी भाजपवर थेट घणाघात केला आहे. त्यामुळे महायुतीचा घटकपक्ष असताना असं होत असेल तर यांच्यात नक्की काय चाललय अशी चर्चा रंगतो. दरम्यान, यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. वारंवार भाजपवर असं बोलण योग्य नाही. याने मन दुखावतात. त्यामुळे आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी या विषयावर बोलणार आहोत असं सागितल. ते माध्यमांशी बोलत होते.



अशा प्रकारे माध्यमांसमोर आरोप करणे हे चुकीचं आहे. त्यांचं काही म्हणणं असेल तर त्यांनी ते युतीमध्ये मांडावं. रामदास कदम यांचं जे म्हणणे असेल ते आम्ही समजून घेऊ, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी रामदास कदम यांना सुनावलं आहे. रामदास कदम हे वारंवार टेकाचं बोलतात. त्यामुळे आमच्या देखील भावना दुखावल्या जातात. आम्ही देखील माणसं आहोत. वारंवार भारतीय जनता पक्षाला बोलणं, हे आम्हाला मान्य नाही. यासंदर्भात मी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करणार असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

## मनोज जरांगेंच्या आरोपात तथ्य नाही; सीएम एकनाथ शिंदेंनी सुनावलं, देवेंद्र फडणवीसांची पाठराखण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील सातत्याने देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करतात. त्यात फडणवीसांमुळे मुख्यमंत्री शिंदेंना आरक्षण देता येत नाही असं विधान त्यांनी केले. त्यावरून देवेंद्र फडणवीसांनी यावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावं असं म्हटलं होते. त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत खुलासा करत मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपात तथ्य नसल्याचं म्हटलं आहे.

मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार एकत्र बसलो. आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावलं. प्रत्येक बैठकीला देवेंद्र फडणवीस होते. मराठा आरक्षणासाठी जो कायदा केला त्यात फडणवीसांची मोलाची भूमिका होती. अजित पवारही सहभागी होते. मनोज जरांगेंच्या मागणीनुसार मराठवाड्यात ज्यांच्या कुणबी नोंदी ते आम्ही देऊ लागलो. मराठा समाजाला ज्या सवलती होत्या त्या दिल्या. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले त्याला विरोध करायला कोर्टात कोण गेले ते आधी बघा असं त्यांनी सांगितले.



तसेच मराठा आरक्षण मिळू नये यासाठी विरोधी पक्षाचा हात आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्या कारकिर्दीत मराठा समाजाला आरक्षण देण्याचं काम झालेले. तेव्हा मीही कमिटीत होतो. देवेंद्र फडणवीस मराठा आरक्षणाला विरोध करतायेत हे पूर्णपणे चुकीचे आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपात तथ्य नाही. आम्ही जो काही निर्णय घेतो तो सर्वानुमते घेतो असं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पाठराखण केली.

**काय म्हणाले होते देवेंद्र फडणवीस?**

राज्याचे सगळे अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडे असतात. इतर सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारावर काम करत असतात. एकनाथ शिंदे आणि मी एकत्रित काम करतो. शिंदेंना पूर्ण पाठबळ आणि पाठिंबा माझा आहे. त्यामुळे जरांगेंनी केलेल्या आरोपावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी कुठलाही प्रयत्न केला आणि मी तो थांबवला असं शिंदेंनी सांगितले तर त्याच क्षणी मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून निवृत्त होईन. आजपर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले ते एकतर मी केले नाहीतर शिंदेंनी केले. एकनाथ शिंदेंच्या पाठिशी मी भक्कपणाने उभा राहिलो आहे. परंतु अशाप्रकारे जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न अतिशय अयोग्य आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होते.

संपादकीय ......

# उदर भरण नोहे...जाणिजे यज्ञकर्म!

आजच्या आधुनिक युगामध्ये पारंपरिक सुग्रास पक्वान्नाची जागा फास्ट फूडने घेतली आहे. या फास्ट फूडपायी लहान मुले अक्षरशः वेडी झाली आहेत. पिझ्झा, बर्गर, नूडल्स, मोमोझ, केक, पेस्ट्री यांसारखे पदार्थ मुलांची प्रथम पसंती असते. त्यामुळे एकेकाळी भाजी, पोळी, वरण, भात यासारख्या पारंपरिक पदार्थांनी अडगळीत आपले स्थान निर्माण केले आहे. नैसर्गिक पदार्थावर प्रक्रिया करून निर्माण होणारे पदार्थ शरीरासाठी अतिशय हानिकारक असतात. तरीही या फास्ट फूडचा मोह आवरता आवरता आवरला जात नाही. त्यामुळे मानवाचे शरीर अनेक दुर्लभ रोगांचे माहेरघर झाले आहे. हे पदार्थ चव आणि खाण्यासाठी सोयीचे असल्याने फास्ट फूड खाण्याचे प्रमाण दरदिवशी वाढत आहे. अशा या प्रक्रिया केलेल्या अन्नामध्ये साखर, चरबी, कॅलरीज व मिठाचे प्रमाण अतिशय जास्त असते. या उलट शरीरास लागणारे पोषक द्रव्ये त्यामध्ये कमी प्रमाणात असतात. खपवळरप ढ असे हे प्रक्रिया केलेले पदार्थ शरीरासाठी घातक असून, शरीराच्या अनेक भागांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

फास्ट फूडमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट फार अधिक प्रमाणामध्ये वापरले जाते. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास होण्याची शक्यता वाढते. फास्ट फूडमध्ये ट्रान्सफॅटचे प्रमाणही अधिक असते; जे शरीरासाठी नुकसानकारक असते. जास्त साखर, चरबी व अतिरिक्त मिठामुळे फास्ट फूड अधिक चवदार बनतात. या तीन पदार्थांमुळे हृदयावर त्याचा गंभीर परिणाम होऊन लोक आजारी पडतात. फास्ट फूडबाबत जगातील अनेक देशांमध्ये संशोधन झाले असून, त्याचा निष्कर्ष भयावह असा आहे. या जंक फूडमधील ट्रान्सफॅटमुळे रक्तामधील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढून चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. त्यामुळे टाईप-२ या प्रकारातील मधुमेह हा आजार बळावण्याचा धोका अधिक संभवतो आणि हृदयविकाराचा धोकाही अधिक वाढतो. आपल्या आहारामध्ये मिठाचे प्रमाण वाढल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रासही होण्याचा धोका अधिक संभवतो. जंक फूडमध्ये कॅलरीजचे प्रमाण अधिक असल्याने लठ्ठपणा होण्याचा धोकाही अधिक असतो. लठ्ठपणा वाढला की, अस्थमा आणि श्वसनासंबंधी इतर अनेक आजार होण्याचा धोका वाढतो.

असे हे प्रक्रिया केलेले जंक फूड खाऊन काही काळासाठी भूक भागत असली, तरी त्याचे होणारे दुष्परिणाम आम्ही कधीच विचारात घेत नाही. ज्या व्यक्तींना फास्ट फूड खाण्याची सवय आहे, अशा व्यक्तींना नैराश्याने बाधित होण्याची शक्यता ५१ टक्के अधिक असते. तर, दुसरीकडे शरीरातील हार्मोन्सवर त्याचा गंभीर परिणाम होऊन प्रजनन क्षमतेवरही त्याचे विपरीत परिणाम होत असल्याचा निष्कर्ष अभ्यासकांनी वर्तविला आहे. फास्ट फूड खाऊन होणारा मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा यांसारख्या आजारांचे प्रमाण सामान्यामध्ये वाढताना दिसत असले, तरी हे आजार होण्याचे वयही मागील दोन दशकामध्ये वयाच्या २५ ते ३० वर्षे एवढे खाली आले आहे. फास्ट फूड तयार करताना ते अधिक काळ टिकावे व पदार्थ ताजे दिसावे यासाठी त्यामध्ये रसायनांची भरमार असते.मनुष्याला या सर्व बाबीची कल्पना असूनही त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून त्याची दिनचर्या रासायनिक होत चालली आहे, ही दुर्दैवाची बाब आहे.'उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' हा श्लोक आम्ही पूर्णपणे विसरलो अन् आयुष्याच्या राखरांगोळीकडे आमची वाटचाल सुरू झाली. आधुनिकतेच्या हव्यासापायी आमच्या अनमोल अशा आयुर्वेदालाही आम्ही अडगळीत टाकले. १०० वर्षं निरोगी जगण्याची कला शिकविणारे आणि आजारच होऊ नये यासाठी दिनचर्येपासून तर ऋतूनुसार खानपानाची शास्त्रोक्त पद्धती त्यामध्ये विशद केली आहे. मुळात आजाराने शरीरामध्ये घरच करू नये हे आयुर्वेद शिकवितो. परंतु हल्ली आधुनिकतेने आम्ही बरबटलो असल्याने आयुर्वेद आम्हास हीन वाटू लागले आहे. फास्ट फूडचे सर्वाधिक गंभीर परिणाम अमेरिकेमध्ये दिसू लागले आहेत.लठ्ठपणाच्या आजारापायी त्रस्त असलेल्या लोकांपायी तेथील शासनही हतबल झाले आहे. परंतु, आम्ही अजूनही सीमारेषा ओलांडली नाही. वेळीच सावध झालो तर हा धोका आम्ही परतवू शकतो.

# पुसदकर महाविद्यालय नांदगाव पेठ येथे रॅगिंग प्रतिबंधक कार्यशाळेचे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती –** स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय नांदगाव पेठ, जिल्हा अमरावती येथे रॅगिंग प्रतिबंधक समिती, राष्ट्रीय सेवा योजना आणि आय क्यू ए सी च्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय रॅगिंग प्रतिबंध कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य विजय दरणे यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या कार्यशाळेला नांदगाव पेठ पोलीस स्टेशन येथील पोलीस उपनिरीक्षक रितेशजी राऊत हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच नांदगाव पेठ येथील प्रथम नागरिक सरपंच सौ. कविताताई डांगे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. विनोद डांगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.पोलीस उपनिरीक्षक श्री रितेश राऊत यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे यासंबंधी तसेच रॅगिंग चे नियम व प्रतिबंधक कायदे, रॅगिंग झाल्यास त्या करिता कायद्यात असलेले शिक्षेचे स्वरूप याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

सरपंच सौ. कविताताई डांगे यांनी विद्यार्थ्यांनी वर्तन करताना समाजमान्य नियमांनी करावे नियमांचा दुरुपयोग होणार नाही याची काळजी घेऊन आपले उच्च शिक्षण पूर्ण करावे याविषयी सखोल मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ विजय दरणे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या विविध समित्यांविषयी माहिती देऊन रॅगिंग प्रतिबंधक कार्यशाळेच्या आयोजनाचे महत्त्व विशद केले. तसेच रॅगिंग प्रतिबंधक सूचना देऊन सखोल मार्गदर्शन केले.

रॅगिंग प्रतिबंधक समितीच्या समन्वयक डॉ . सुनिता बाळापुरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविका द्वारे कार्यशाळेचा उद्देश, भूमिका स्पष्ट करून पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यशाळेचे संचालन आय क्यू ए सी समन्वयक डॉ .पंकज मोरे यांनी केले, तर कु. दिव्या सुरजुसे हिने उपस्थित सर्वांच्या प्रति आभार व्यक्त केले.

सदर कार्यशाळेला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग डॉ .पी. आर. जाधव, प्रो. आर. टी. ब्राह्मणे, डॉ जी. एम. तीरमनवार, डॉ .एस. एस. माहुलकर, डॉ . एस. के. पवार, डॉ. व्हि.टि. अडलोक, पो. कॉ. संजय देऊळकर, यांचेसह शिक्षकेत्तर कर्मचारी श्री ज्ञानेश्वर भाऊ बारस्कर, विनायक पावडे, रेखा पुसदकर, राहुल पांडे, दिलीप पारवे, अनिल शेवतकर यांच्या सह बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थिती होते. सर्वांना या कार्यशाळेतील मार्गदर्शनाचा नक्कीच लाभ होईल. सर्वांच्या अथक प्रयत्नांनी कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली.

# खरिपातील सोयाबीन, कापूस, मका पिकांवरील कीड-रोगांचे असे करा व्यवस्थापन







**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक**

खरिपातील पिके सध्या वाढीच्या अवस्थेत असून फुलोऱ्यात आलेल्या पिकांना किडींचा आणि रोगांचा प्रादुर्भाव होताना दिसत आहे. सोयाबीन, कापूस आणि मका ही राज्यातील प्रमुख पिके असून या काळात शेतकऱ्यांना रोगांवर नियंत्रण करणे महत्त्वाचे असते.

सोयाबीन पिकांवर खोडमाशीचा प्रादुर्भाव, अळी, कापसातील रशशोषण किडी, मका पिकांवर लष्करी अळीच्या प्रादुर्भाव होत आहे. याचे व्यवस्थापन करण्यासाठी कृषी विभागाने यासंदर्भातील पीक सल्ला दिला आहे.

१. सोयाबीन पिकावर खोडमाशीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी.

२. सोयाबीन पिकावरील पाने खाणाऱ्या अळीच्या उपद्रवाचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन (कामगंध) सापळे नियंत्रणासाठी वापरावेत.

३. सोयाबीन पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्यावर नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी आणि आर्थिक नुकसान पातळी नंतर प्रोफेनोफॉस ५० ई सी २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.

४. कापुस पिकावर रस शोषण करणाऱ्या किडींचा (मावा, फुलकिडे, पांढरी माशी) प्रादूर्भाव दिसून येत असुन यांच्या व्यवस्थापनासाठी असीटामिप्रीड २० टक्के ३० ग्रॅम किंवा थायमिथॉक्झाम २५ टक्के

४० ग्रॅम किंवा फ्लोनिकॅमिड ५० टक्के ६० ग्रॅम प्रति एकर पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.

५. कपाशी पिकावरील शेंदरी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी एकरी किमान ४ ते ५ कामगंध सापळे लावावे.

६. कापूस पिकात पाणी साचल्यामुळे मर आणि मूळकूज रोग लक्षणे आढळलेल्या शेतात, रोगग्रस्त रोपाच्या सुरुवातीच्या काळात व निरोगी रोपांच्या बाजूस रोग व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून मुळापर्यंत जाईल अशी आळवणी पावसाची उघडीप पाहून करावी.

७. मका पिकावरील लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळत आहे नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी किवां मेटारायझीयम अनिसोपली ५० ग्रॅम (२ ु १० ८ उत्रग्ग) किंवा नोमुरीया रीलाई १.१५ टक्के (२ ु १० ८ उत्रग्ग) ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

८. मका पिकावरील लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम १२.६% लॅमडा सायहॅलोथ्रीन ९.५% झेडसी २.५ मीली प्रती लीटर पाण्यात किंवा क्लोरॅन्ट्रानीलीप्रोल १८.५ एससी, ३ मीली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी पावसाची उघड बघुन करावी.

९. भात पिकांत निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची तीव्रता कमी असताना व स्टीकरचा वापर करून फवारावे.

१०. मुग पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम या बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात मिसळून फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.




## शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे दिसून येतात ५ लक्षणं, येऊ शकतो हृदयविकाराचा झटका



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक–** शरीर निरोगी राहण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी पिणं गरजेचं आहे. ऋतू कोणताही असो शरीराला पाणी आवश्यक आहे. पण कामाच्या व्यापामुळे किंवा इतर कारणांमुळे आपण कमी प्रमाणात पाणी पितो. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास विविध समस्या निर्माण होतात. शरीरात पाण्याची कमतरता भासल्यास ओठ कोरडे पडणे किंवा फाटणे या खुणा दिसून येतात. याव्यतिरिक्त आपले शरीर अनेक संकेत देते. ज्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता ओळखता येऊ शकते. शरीरात पाण्याची कमतरता भासल्यास शरीर नक्की कोणते संकेत देते? पाहूयात

**हृदयाच्या आरोग्यावर धोका**

पाण्याच्या कमतरतेचा थेट परिणाम हृदयाच्या आरोग्यावर होतो. कारण डिहायड्रेशनचा शरीराच्या अवयवांवर आणि कार्यांवर नकारात्मक परिणाम होतो. मुख्य म्हणजे हृदयाच्या कार्यावरही परिणाम होतो.

**अनियमित हृदयाचे ठोके**

शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखण्यासाठी पुरेसे पाणी पिणे महत्त्वाचे आहे. जेव्हा शरीरात पाण्याची कमतरता असते तेव्हा इलेक्ट्रोलाइट्सचे असंतुलन होऊ शकते, ज्यामुळे हृदयाच्या ठोक्यावर देखील परिणाम होतो.

**रक्त प्रवाह कमी होऊ लागतो**

पाण्याच्या कमतरतेमुळे रक्त घट्ट होते. ज्यामुळे शरीरातील रक्त प्रवाह कमी होतो. घट्ट रक्त पंप करण्यासाठी हृदयावर अधिक दबाव टाकला जातो. अशा स्थितीत उच्च रक्तदाब आणि हृदयाच्या इतर समस्या उद्भवू शकतात.

**शरीराचे तापमान असंतुलित होते**

पाणी शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करते. पाण्याच्या कमतरतेमुळे शरीराच्या तापमानात असंतुलन होऊ शकते, ज्यामुळे हृदयावर देखील दबाव वाढतो.

**किडनीवर विपरीत परिणाम**

पाण्याच्या कमतरतेमुळे किडनीवरही वाईट परिणाम होतो आणि किडनीच्या समस्यांमुळे हृदयावरही नकारात्मक परिणाम होतो, कारण दोन्ही अवयव एकमेकांशी जोडलेले असतात.

**चयापचय मंदावते**

पाण्याच्या कमतरतेमुळे चयापचय मंदावते. ज्यामुळे शरीरातील चरबी आणि विषारी पदार्थ वाढण्याचा धोका वाढू शकतो.

# अमरावती-बडनेरा शटल राहणार दोन महिने बंद




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती–** भुसावळ विभागातील बडनेरा रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ३ व ४ च्या विस्तारीकरणाचे काम सुरू झाले आहे. या कामासाठी अमरावती-बडनेरा शटल (लोकल) सेवा १७ ऑगस्टपासून बंद करण्यात आली असून ती १५ ऑक्टोबरपर्यंत बंद राहणार आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासारख्या उत्सवांच्या काळात ही सेवा बंद राहणार असल्याने बडनेरा येथून अमरावतीत तसेच अमरावतीहून बडनेरा येथे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होणार आहे. प्रवाशांना जास्त पैसे खर्च करून इतर पर्यायी साधनांचा वापर करावा लागणार आहे.

शटल क्र. ०९३७५ बडनेरा ते अमरावती, शटल क्र. ०९३७६ अमरावती ते बडनेरा, शटल क्र. ०९३७७ बडनेरा ते अमरावती, शटल क्र. ०१३७८ अमरावती ते बडनेरा, शटल क्र. ०९३७९ बडनेरा ते अमरावती, शटल क्र. ०१३८० अमरावती ते बडनेरा या कालावधीत बंद राहणार आहे. दिवसभरात शटलच्या बडनेरा ते अमरावती तीन तर अमरावती ते बडनेरा तीन अशा एकूण सहा फेऱ्या व्हायच्या. यामुळे बडनेरा स्टेशनवर उतरणाऱ्या प्रवाशांना तेथूनच अमरावतीला येणे शक्य होते. परंतु, आता दोन महिने शहर बस किंवा इतर पर्यायी वाहनांचा बडनेरा ते अमरावती प्रवासासाठी शहरवासीयांना वापर करावा लागणार आहे.

# देवराखी कशाला म्हणतात? कोणत्या देवाला ती बांधतात? जाणून घ्या!

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक –** यंदा १९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी आपण आपल्या भाऊरायाला जितक्या प्रेमाने राखी बांधतो, तेवढ्याच प्रेमाने देवालाही राखी बांधतो. 'तुम ही हो बंधू, सखा तुम्ही' अशी सलगी देवाशी असल्यामुळे ऋणानुबंध दृढ करण्याचा हा एक सोपस्कार आपण दरवर्षी आठवणीने पाळतो. त्यातही या पाच देवतांना त्यांच्या आवडत्या रंगाची राखी बांधल्याने त्यांच्याशी स्नेह जडतो आणि आपल्या कुटुंबाच्या सुखदुःखात भगवंत मोठ्या भावाप्रमाणे मदतीला येतो.

लोक लक्ष्मीची पूजा करतात आणि तिला मिळवण्यासाठी अट्टाहास करतात. परंतु जे विष्णूंची उपासना करतात, त्यांना आपोआपच लक्ष्मीप्राप्ती होते. कारण जिथे विष्णू तिथे लक्ष्मी. या दोहोंचा आशीर्वाद मिळवायचा असेल, तर विष्णूंची उपासना सुरू करा. रक्षा बंधनाच्या दिवशी विष्णूंना पिवळ्या रंगाची राखी बांधा आणि जगद्पित्याशी बंधुत्व जोडण्याचा प्रयत्न करा.

महादेवाचे कुठेही देऊळ नसते. परंतु त्याची आत्मज्योती ज्यात विसावते, ते म्हणजे शिवलिंग. श्रावण मासात आपण महादेवाची पूजा करतोच, त्याचबरोबर त्यांना निळ्या रंगाची राखी बांधली असता त्या धाग्याची सकारात्मकता आपल्याला दिलासा देत राहील. वाईट गोष्टींचा नायनाट करणारे महादेव आपल्या पाठीशी उभे राहून 'माझ्या कडे देव माझा पाहतो आहे' हा दिलासा देत राहतील.



ज्यांना भाऊ नसतो अशा कितीतरी भगिनी कृष्णाला आपला भाऊ मानून राखी बांधतात. संतांनी देखील वर्णन केले आहे, 'कृष्ण माझी माता, कृष्ण माझा पिता, कृष्ण माझा गुरु, कृष्ण माझा तारु' सर्वस्व कृष्ण मानणाऱ्या भक्तांना श्रीकृष्ण बंधू रूपातही भेटतो. त्याने ज्याप्रमाणे द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या प्रसंगी वस्त्र पुरवून तिचे लज्जारक्षण केले, तसा बाका प्रसंग आपल्याही आयुष्यात आला तर कृष्ण पाठीशी उभा राहावा म्हणून कृष्णाला हिरव्या रंगाची राखी बांधा.

हनुमंताच्या नुसत्या नावाने भूत पिशाच्च निकट येत नाहीत, असे हनुमान चालीसा मध्ये संत तुलसी दासांनी वर्णन केले आहे. असा कणखर भाऊ आपल्याला लाभला, तर कसलेही भय उरणार नाही. आयुष्यात उत्तरोत्तर प्रगती होत राहील. यासाठी श्रद्धेने हनुमंताला केशरी रंगाची राखी बांधायला विसरू नका.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १९ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# शिक्षक बँकेच्या सभासदांना ९ टक्के लाभांश देण्याचा ठराव

## बडतर्फ संचालकांना परत घेण्यावरही आमसभेत झाले एकमत






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** येथील जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेच्या सभासदांना यंदा ९ टक्के लाभांश देण्यासह ४ जानेवारीला बडतर्फ केलेल्या पाचही संचालकांना परत बोलावण्याचा ठराव रविवारी आमसभेत घेण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत यांच्या अध्यक्षतेखाली नवसारी परिसरातील क्षितिज पॅलेस येथे ही आमसभा झाली. सभेला उपस्थित सदस्यांनी १० टक्के लाभांशाची मागणी केली होती. परंतु पूर्वीच्या ८ टक्क्यांमध्ये एक टक्क्याची भर टाकत संचालक मंडळ आणि सदस्यांमध्ये नऊ टक्क्यांवर एकमत झाले. या मागणीसोबतच कर्जाचा व्याजदर ११ वरून १० टक्क्यांवर आणण्याचीही मागणी केली होती. मात्र त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. विधिज्ञांचा सल्ला आणि आरबीआयच्या निकषांमधील तरतुदींचा ताळमेळ बघून निर्णय होईल, असे पीठासीन सभापतींचे म्हणणे आहे. बँकेच्या हिताविरुद्ध कारवाई केल्याच्या आरोपावरून मंगेश खेरडे, प्रभाकर झोड, गौरव काळे, मनोज चोरपगार आणि संजय नागे या पाच संचालकांना बँकेने ४ जानेवारी रोजी बडतर्फ केले. मात्र आजच्या आमसभेत संचालक मंडळाचा तो ठराव रद्द करून त्यांना परत बोलवा, असा ठराव एकमताने संमत करण्यात आला. बँकेचे माजी अध्यक्ष किरणपाटील यांनी हा ठराव मांडला होता. सध्या हा मुद्दा न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे न्यायालयाचा प्रस्तावित निकाल आणि विधिज्ञांच्या सल्ल्यानंतरच याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाईल, असे पीठासीन सभापतींनी जाहीर केले. तसेच आमसभेत एकूण १७ विषयांना मंजुरी देण्यात आली. यात ३१ मार्चचा वार्षिक अहवाल, सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक, बँक मुख्यालयाची नवी इमारत उभी करण्याच्या विषयांचा समावेश आहे. चर्चेदरम्यान सुनील केणे, सुनील कुकडे, राजेंद्र दीक्षित, पंकज गुल्हाने, अशोक पारडे आदींनी मते मांडली. सभेला उपाध्यक्ष विजय कोठाळे, संचालक तुळशिदास धांडे, प्रफुल्ल शेंडे, सुरेंद्र मेटे, कैलास कडू, उमेश चुनकीकर, अजयानंद पवार, सरिता काठोळे आदी उपस्थित होते.

### पुढे काय होणार ?

बँकेच्या पाचही संचालकांनी त्यांच्या बडतर्फीला हाय कोर्टात आव्हान दिले आहे. १२ सप्टेंबरला या प्रकरणाची सुनावणी होईल. तत्पूर्वी आजच्या आमसभेने पारित केलेले कामकाज विभागीय सहनिबंधकांकडे पाठवले जात असतानाच हा ठरावही त्यांच्याकडे पाठवला जाईल. त्यामुळे न्यायालयात याचिकाकर्त्यांची बाजू आणखी सबळ होण्याची स्थिती निर्माण झाली आहे.

## आज तिसरा श्रावण सोमवार

# सातपुड्यात गुंजला 'हर्ऽऽ बोला महादेवचा गजर', भाविकांची मांदियाळी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९धारगड**

पूर्णा नदीचे पवित्र जल घेऊन अनवाणी पायाने चालत धारगड येथे मोठ्या महादेवाला जलभिषेक करण्यासाठी आज शेकडो शिवभक्त कावड खांद्यावर घेऊन धारगडच्या गुफेकडे रवाना झाले आहे.

रविवारी रात्रभर पायी प्रवास करत दुसऱ्या दिवशी सोमवारी महादेवाला जलभिषेक करण्यात आला. श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवार रोजी श्री क्षेत्र धारगड येथे मोठी यात्रा भरते सातपुड्याच्या पर्वतरांगात वसलेल्या तसेच अकोट शहरापासून ३६ किलोमीटर अंतरावरील श्री क्षेत्र धारगड येथे शिवभक्त मोठ्या संख्येने महादेवाच्या दर्शनासाठी धारगड दाखल झाले आहेत.

शहरात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे .राज्याच्या कानाकोपर्यातुन आलेले हजारो कावळधारी शिवभक्त हर्ऽऽ बोला महादेवाच्या गजरातपायी चालत सोमवारी पहाटे महादेवाला जलाभिषेक घालण्यात आला . धारगड यात्रेला महाराष्ट्रातील कान्याकोपऱ्यातून हजारो शिवभक्त हजेरी लावत असतात. धारगडला जाणारे शिवभक्त रविवारी दुपारपासून अकोटमधून धारगडकडे जाण्यासाठी रवाना झाले . सोमवारी सकाळी सातपुड्यात 'हर्ऽऽ बोला महादेवचा गजर' ऐकायला मिळाला हजारो शिवभक्त महादेवाला भक्तीभावपूर्ण वातावरणात जलाभिषेक केला दरम्यान आज कावडधार्यांमुळे धारगडकडे जाणारा रस्ता फुलून गेला होता. पायी जाणाऱ्या भक्तांसाठी अमोना, धारगड, शार्दुलबाबा टेकडी, नरनाळा आणि शहानूर असा मार्ग असून. रविवारी अकोट बसस्थानकावरुन बोर्डीपर्यंत बसेस सोडण्यात आल्या होत्या.आज सकाळी शहानूर वरून शिवभक्तांचा परतीचा प्रवास सुरू झाला

विविध सामाजीक संघटने तर्फे भाविकांना फराळ व मोफत आरोग्य सेवा पुरवण्यात आल्या आहेत. श्रावण महिना म्हणजे शिव आराधनेचा सुवर्णकाळ, हा योग सातपुड्यात आज श्रावण सोमवारी पहावयास मिळाला .अकोट शहरात शिवभक्तांच्या सेवेसाठी सेवाधारी मंडळांनी मोफत फराळ, चहा आदीची व्यवस्था करण्यात आली. धारगड मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# अन्न निरीक्षक असल्याचा बनाव उकळले चार किलो दही-तूप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** :अन्न निरीक्षक असल्याचे भासवून शिवसेनेच्या शिंदे गटाच्या दोन पदाधिकाऱ्यांनी चाचणीच्या नावाखाली एका डेअरी चालकाकडून तीन किलो तूप आणि एक किलो दही जबरीने घेतले. पैसे मागितल्यानंतर जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रारीवरून दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.धामणगाव रेल्वे-मोर्शी विधानसभा जिल्हाप्रमुख निशांत हरणे (४०, रा. साईनगर) आणि बडनेरा शहरप्रमुख गुड्डू कत्तलवार (३५, रा. लायब्ररी चौक फ्रेजरपुरा) यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. ही घटना ११ ते १७ ऑगस्ट दरम्यान घडली.

बडनेरा येथील पाचबंगला परिसरातील नीलेश यादव (२९) यांची उत्तमसरा येथे डेअरी आहे. ११ ऑगस्ट रोजी दुपारी नीलेश यादव आपल्या डेअरीत असताना निशांत हरणे व गुड्डु कत्तलवार हे काळ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून तेथे आले. या दोघांनी अन्न निरीक्षक असल्याचे भासवत तीन किलो तूप आणि एक किलो दही घेतले. नीलेश यादव यांनी त्याचे १८६० रुपये झाल्याचे सांगितले. तुम्ही मला ओळखले नाही का? मी निशांत हरणे आहे, मी काहीही करू शकतो. तुमच्या बॉसला सांगा, अशी धमकी देऊन ते निघून गेले. त्यानंतर नीलेश यादव यांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयात जाऊन तपासणी केली असता, एकाही अधिकाऱ्याने तपासणीसाठी नमुने घेतले नसल्याचे उघड झाले. त्यामुळे त्यांनी पोलिस ठाणे गाठले व रीतसर तक्रार नोंदवली.-

# निवडणूक म्हणजे युद्ध नव्हे, तर वैचारिक पातळीवर लढण्याचे साधन

## दर्यापूर येथे गुणवंत देवपारे यांची पत्रकार परिषद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ दर्यापूर –** सध्याच्या काळात विविध पक्षातील अनेक जण अतिशय खालच्या पातळीवर टीका टिप्पणी करताना दिसत आहेत. यामुळे सामान्य कार्यकर्ता कमालीचा दुखावला जात आहे. विधानसभा निवडणूक ही केवळ निवडणूक म्हणून लढवणे क्रमप्राप्त असताना सद्य:स्थितीत युद्धाप्रमाणे भासत आहे. सर्वच नेत्यांनी वैचारिक पातळीवर ही निवडणूक लढवल्यास बंधुभाव टिकून राहण्यास मदत होणार आहे, असे मत गुणवंत देवपारे यांनी दर्यापूर येथे पत्रकार परिषदेतून बोलताना व्यक्त केले. दर्यापूर विधानसभा ही अनुसूचित जातीकरिता राखीव असल्याने काँग्रेसकडून निवडणूक लढवण्यासाठी ते इच्छुक आहेत. या वेळी त्यांनी दर्यापूरमधील बंद पडलेली संत गाडगे बाबा सहकारी सूतगिरणी सुरू करण्याची मागणी शासनाकडे करणार असल्याचे सांगितले. तसेच अंजनगाव येथील अंबा साखर कारखाना, एमआयडीसीतील उद्योग, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव, रोजगार आदीविषयी आपले मत मांडले. दर्यापूर तालुका खारपाणपट्ट्यात येत असल्याने येथील शेती वाचवण्यासाठी मध्यम व लघु प्रकल्प पुढील काळात आणण्याचा संकल्प व्यक्त केला. शेतातील कच्चा माल वापरून नवे उद्योग उभारले जाऊ शकतात. याबाबत खासदार यांच्या मध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. दर्यापुरात खा. बळवंत वानखडे यांनी उत्तम कार्य केले आहे. यापुढेही त्यांच्या मार्गदर्शनात काम करणार असल्याचे पत्रकार परिषदेत गुणवंत देवपारे यांनी सांगितले आहे.

# नांदगाव खंडेश्वर मधील मूलभूत समस्या सोडवण्यासाठी आ. अडसड यांना साकडे

## माकपच्या शिष्टमंडळाने दिले निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९नांदगाव खंडेश्वर**

येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तालुका कमिटीच्या शिष्टमंडळाने आ. प्रताप अडअड यांची भेट घेऊन नांदगाव खंडेश्वर शहरवासीयांच्या मूलभूत स्थानिक प्रश्नांबाबत चर्चा करत निवेदन दिले आहे.गावठाण, शासकीय , जागेवर ३०-४० वर्षांपासून राहत असलेल्या भोगावठा धारकांना गाव नमुना ८-अ मिळावा, तो न मिळाल्यामुळे घरकुलसारख्या योजनेपासून वंचित आहेत. शबरी घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, यापासून अनेक परिवार वंचित आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पहिला डीपीआर मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना ३० हजारांचे अनुदान मिळालेले नाही. त्याचबरोबर दुसरा डीपीआर मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना उर्वरित हप्ते मिळालेले नाही. ते तातडीने मिळावे. नांदगाव खंडेश्वर शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न, एमआयडीसी बाबतचा प्रश्न या वेळी निवेदनातून मांडण्यात आला. सकारात्मक चर्चा करून प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन आ. अडसड यांनी माकपच्या शिष्टमंडळाला दिले. शिष्टमंडळात माकपचे तालुका सचिव श्याम शिंदे, अनिल मारोटकर, अशोक केसरखाने, रुस्तमखाँ पठाण, वैदखाँ पठाण, राजेंद्र राऊत, राजगुरू शिंदे, किशोर शिंदे उपस्थित होते, असे कळवण्यात आले.

# मतदार नोंदणीसाठी उद्या मंगळवारची डेडलाइन

## यादीत नाव, पत्त्यासह इतर तपशीलात करता येईल दुरुस्ती



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती-** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीचा दुसरा संक्षिप्त कार्यक्रम सध्या जिल्ह्यात सुरू आहे. मतदाराला नावनोंदणीसाठी २० ऑगस्ट ही डेडलाइन आहे. ही नावे ३० ऑगस्टच्या अंतिम मतदार यादीत समाविष्ट होणार असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले.

मतदार नोंदणीची प्रक्रिया निरंतर सुरू राहते. सध्या सुरू असलेल्या मतदार यादीत पात्र मतदाराला नाव नोंदणी करता येते. तसेच मतदारांना नावात, पत्त्यामध्ये बदल, मोबाइल क्रमांक जोडणी, दिव्यांगत्व चिन्हांकित करणे, योग्य कारणांसाठी मतदारओळखपत्र पुन्हा मिळविणे, मतदार ओळखपत्रासह आधार जोडणे, कायमचे स्थलांतर, मतदाराचा मृत्यू झाल्याने नाव वगळणे आदी दुरुस्ती वबदल करता येणार आहे. शिवाय मतदार यादीमधील नावाविषयी दावे व हरकती दाखल करता येणार आहे. त्यानंतर २९ ऑगस्टपर्यंत सुनावणी होऊन जिल्हाधिकारी आयोगाचे मान्यतेने ३० ऑगस्टला अंतिम मतदार यादी जाहीर करणार आहे. यानंतरही पात्र मतदारांना नाव-नोंदणी करता येईल; मात्र ही नावे पुरवणी यादीत राहणार आहे. जिल्ह्यात सहा ऑगस्टला प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झालेली आहे. या यादीमध्ये आपल्या नावाची खातरजमा करणे व त्यामध्ये आवश्यक दुरुस्ती करण घेणे महत्त्वाचे असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाने दिली.

# टोलच्या सुरक्षारक्षकांच्या वेतनवाढीचा प्रश्न ऐरणीवर

## दहा वर्षांपासून वेतनवाट नाही, सुरक्षारक्षकांचे एकदिवसीय काम बंद आंदोलन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९नांदगाव पेठ –** जीवाची बाजी लावत टोल नाक्याच्या सुरक्षेसाठी रात्रंदिवस तैनात असणाऱ्या सुरक्षारक्षकांच्या वेतनवाढीचा प्रश्न ऐरणीवर असून मागील दहा वर्षांपासून अल्पशा मानधनावर काम काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांनी अखेर रविवारी टोल नाक्यावर एकदिवसीय काम बंद आंदोलन केले. टोल नाका व्यवस्थापकांनी तूर्तास आश्वासन देऊन सुरक्षा रक्षकांना ३१ ऑगस्ट पर्यंत समस्या निकाली काढण्यात येणार असल्याचे सांगितले त्यामुळे सायंकाळी सर्व सुरक्षारक्षक आपल्या कर्तव्यावर पूर्ववत झाले. येथील आयआरबी टोलनाक्यावर मागील दहा वर्षांपासून अगदी तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागत आहे. आजच्या महागाईच्या काळात सुद्धा डोळ्यात अंजन घालून जीवाची बाजी लावणाऱ्या सुरक्षा रक्षकांना केवळ ९८०० रुपये एवढ्या अल्पशा वेतनावर काम करावे लागत आहे.यामध्ये सुद्धा दहा महिन्यांची पीएफ रक्कम खात्यात जमा करण्यात आली नसल्याने संतप्त सुरक्षारक्षकांनी सकाळपासून टोल नाक्यावर काम बंद आंदोलन सुरू केले. आपल्या हक्काच्या वेतनवाढीसाठी तसेच अन्य सुविधांसाठी सुरक्षारक्षकांनी बंद पुकारल्यानंतर टोल व्यवस्थापक गायकवाड यांनी वरिष्ठांकडे याबाबत पाठपुरावा करून ३१ ऑगस्ट पर्यंत मागण्यांच्या पूर्ततेसाठी सुरक्षारक्षकांना वेळ मागितला व मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यांनतर सायंकाळी सर्व सुरक्षारक्षकांनी आपले काम बंद आंदोलन मागे घेऊन कर्तव्यावर पूर्ववत झालेत.यावेळीरामेश्वर कोठार,प्रफुल इंगोले, कैलाश आठवले, कोमल वाघमारे,प्रवीण श्रीनाथ,सतीश सवईकर,मनोज गडलिंग, अतुल हिवे,अतुल गडलिंग, निलेश कापडे, निलेश घोडेस्वार,हर्षद कापडे, प्रेमचंद खंडारे, प्रकाश नेमाडे,दुर्वेश जोगे,अक्षय किर्तकार,नितीन नांदणे,मुकेश चौहान,निकेश तराले,आर. आर .इंगोले,संदीप भगत,राजेंद्र इंगोले,राजेश तायडे,राजेंद्र इंगळे आदी सुरक्षारक्षक या कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते.

# अमरावतीला नवी दिशा देण्यासाठीच माझी उमेदवारी : पप्पू उर्फ मंगेश पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** अमरावतीतल्या नेत्यांचा पक्ष आणि विचार दोन्ही बदलले आहेत. ज्यांना काल मतदान केले ते आज दुसऱ्याच पक्षात आहेत. नेत्यांना त्यांच्या चुका मतदारांनी लक्षात आणून द्यायला पाहिजे, परंतु तसे आपण करत नाही. त्यामुळेच पाच वर्षे शहरात कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे साम्राज्य होते आणि ऐन निवडणुकीच्या काळात मनसेने आंदोलन केल्यावर कचरा उचलला गेला. अमरावती शहराचा विकास हा




भरकटला असून त्याला नवी दिशा देण्यासाठी नव्या विचारांची आणि नव्या सहकाऱ्यांची गरज असल्यामुळेच मी माझे पाऊल विधानसभेच्या निवडणूकीत टाकतो आहे, असे प्रतिपादन पप्पू उर्फ मंगेश पाटील यांनी केले.पप्पू पाटील मित्रपरिवाराच्या वतीने नवसारी रोडवरील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडा संकुल येथे आयोजित स्नेहमिलन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते विश्वासराव देशमुख होते.

यावेळी कार्यक्रमाला डॉ. राजीव जामठे, प्रकाश साबळे,सिद्धार्थ वानखडे, विजय राऊत, – सुरेंद्र गावंडे, डॉ. प्रफुल्ल गवई, – विठ्ठलराव भटकर, जयंतराव वानखडे, सुनील भालेराव, विनोद राजूरकर, समित सिगई, धनंजय बंड, दिलीप खत्री, ढाकूलकर, बिजवे, पडोळे, वासुदेवराव जाधव, दाळू आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी, राजकीय नेते, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात दिग्गजांची भरगच्च उपस्थिती होती. पप्पू पाटील यांच्या पाठिशी आपलासदैव आशिर्वाद आणि प्रेम असून त्यांच्या उमेदवारीला आम्ही पाठिंबा देत असल्याचा विश्वास यावेळी मंचावरील उपस्थितांनी बोलतानाव्यक्त केला. हजारोंच्या संख्येने परिसरातील नागरिक तसेच मित्र मंडळीची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.

### राजकीय नेत्यांच्या मुलांच्या पाया पडावे लागते विश्वासराव देशमुख

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना विश्वासराव देशमुख यांनी आपण अनेक वर्षे राजकारणात इमानदारीने पक्षाची सेवा केली असून पक्षानेही आपल्याला भरपूर काही दिले आहे. परंतू आता शहराच्या भल्यासाठी एखादा चांगला उमेदवार जो अनेक वर्षांपासून प्रत्येकाशी आपलेपणाने जुळून आहे अशा नेत्याला संधी देण्याची ही वेळ असल्याचे विश्वासराव देशमुख म्हटले.

### अमरावतीच्या संस्कृतीला पप्पू पाटील यांनी दूरवर पोहोचवले – विजय राऊत

आज आम्हाला हे शहर स्वच्छ आणि सुंदर करायचे असेल तर आता चांगल्या नेतृत्वाची गरज आहे. मतदार हा क्रांती करत असतो आणि तोच नव्या नेतृत्वाची उभारणी करत असतो. अमरावतीचे सांस्कृतीक कार्य देशभरात पोहोचविण्याचे काम पाटील यांनी केले आहे, असे विजय राऊत म्हणाले.

### पप्पू पाटील हे जनतेचे उमेदवार–प्रकाश साबळे

चळवळीतील कार्यकर्त्यांना संधी देण्याची ही संधी सर्वसामान्य माणसाच्या हाती आहे अन्यथा चळवळी संपून जातील. जनतेचा उमेदवार म्हणून पप्पू पाटील व्यांच्या पाठिशी आपण सर्वांनी उभे राहिले पाहिजे असे मत प्रकाश साबळे यांनी यावेळी व्यक्त केले.–




# अ. भा. विद्यार्थी परिषदेचा कॅन्डल मार्च

## कोलकाता घटनेवरून विद्यार्थी संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती –** कोलकाता येथील वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर विद्यार्थीनीवर क्रूरपणे अत्याचार करून हत्या झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ व पिडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या अमरावती महानगराच्यावतीने शनिवारी सायंकाळी कॅन्डल मार्च काढण्यात आला होता.

त्याला विद्यार्थांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. विद्यार्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. कोलकात घटनेनंतर समाजमन सुन्न झाले आहे. जागोजागी पडसाद उमटत आहे. सदर घटनेच्या निषेधासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख स्मारक, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन) पर्यंत कॅन्डल मार्च काढण्यात आला. या कॅन्डल मार्चमध्ये अमरावती शहरातील जवळ जवळ सर्व वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी अनेक वैद्यकीय छात्रांनी आपले मत सर्वांसमोर मांडले यामध्ये काहींनी कवीतेतून आपला रोष व्यक्त केला. यावेळी अभाविप अमरावती महानगर मंत्री रिया गुप्ते, प्रांत प्रमुख अनिकेत पजाई, अमरावती महानगर सहमंत्री रितेश देशमुख व इतर वैद्यकीय छात्र व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिडितेला श्रद्धांजली अर्पण करून लवकरात लवकर न्याय मिळावा अशी एकमुखी मागणी यावेळी कारण्यात आली.

# कारमधून दारुची अवैध वाहतूक करणाऱ्या तिघांना पकडले

### भातकुली पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती –** कारमधून देशी दारुची अवैध वाहतुक करणाऱ्या तिघांना भातकुली पोलिसांनी शनिवारी (ता.१७) सायंकाळी अटक व दारु आणि कार असा एकूण २ लाख ३६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सतीश किसनराव कुरळकर (वय २४ रा. पेढी क्वॉटर, भातकुली), साईकुमार स्वामीगौड गोट्टीप्रथी (वय २७ रा. जांडागल्ली, ता.




भिकनुर, जि. निझामाबाद, राज्य तेलंगाना,ह.मु.माना जि. अकोला) आणि राजू उर्फ भुऱ्या नामदेव खंडारे (रा. गणोजादेवी) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत. भातकुली पोलीस शनिवारी सायंकाळी परिसरात गस्तीवर असताना भातकुली येथील टेकडीपुरा परिसरात एक कार (एम.एच. ३७ ए. ३०१८) संशयास्पदरित्या फिरतअसल्याची माहिती मिळताच पोलीस तेथे पोहचले. कारला थांबवून पाहणी केली असता कारमध्ये देशी दारुच्या ५६४ बॉटल दिसल्या.

तिघांना अटक आणि कार व दारुसाठा जप्त करण्यात आला. भातकुलीचे ठाणेदार रविंद्र राजुलवार यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अशोक वाघ, पोलीस कर्मचारी राजेश बोरकुटे, प्रशांत यादव, शफी बेनिवाले, गौतम ढोणे आणि शेखर गायकवाड यांनी ही कारवाई केली.

# गांजा विकणाऱ्या महिलासह दोघांना अटक

### रहिमापूर पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९रहिमापुर** गांजा विकणाऱ्या महिलेसह दोघांना रहिमापुर पोलिसांनी शनिवारी (ता. १७) सायंकाळी अटक व त्यांच्या घरातून १ लाख १५ हजार रुपये किमतीचा ५ किलो ७८० ग्रॅम गांजा जप्त केला. परवीन युनुस खान (वय ४५) आणि जसीम बबलु वानखडे (वय ४१, दोन्ही. रा. कापुसतळणी) अशी अटकेतील आरोपींचे नावे आहेत.परवीन युनुस व जसीम




वानखडे हे राहते घरातून अवैध गांजा विक्री करीत असल्याची गुप्त माहिती रहिमापुर पोलिसांना शनिवारी सायंकाळी मिळाली होती. त्या आधारावर पोलिसांनी त्यांच्या घरी धाड घालून घरझडती घेतली. त्यांच्या घरात ५ किलो ७८० ग्रॅम गांजा दिसला. तो जप्त आणि दोघांना अटक केली.

ठाणेदार अनंतराव वडतकर यांच्या नेतृत्वात पांची पोलीस उपनिरीक्षक गजानन डोकेकर, महिला पोलीस कर्मचारी रामरती भिलावेकर, नागोराव चाई जऊळकर, दुधाराम चव्हाण, ज्ञानेश्वर अघडते, दिलीप वानखडे, संदीप वाघमारे, आदीनाथ खाडे, मोनाली बोदुळे आणि संतोष माहुरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# काँग्रेसच्या जातीयवादी प्रवृत्तीचा वंचित बहुजन युवा आघाडीने केला निषेध

## सागर भवते यांच्या नेतृत्वात तीव्र निदर्शने

**विदर्भ प्रजासत्ताक**

**तिवसा** काँग्रेस पक्षाचे वतीने स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देणारे लावण्यात आलेल्या होर्डिंगवर राष्ट्रपुरुषांमध्ये राष्ट्रनिर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो वगळल्याने वंचित बहुजन युवा आघाडीचे वतीने जिल्हा महासचिव सागर भवते यांच्या नेतृत्वात आज शहरातील पेट्रोलपम्प चौकात तीव्र निदर्शने करून काँग्रेस पक्षाचा निषेध करण्यात आला. भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारत देशाच्या जडणघडणीत मोठे योगदान असून देशात समताधिष्टीत लोकशाही केंद्रीत व्यवस्था निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. परंतु काँग्रेस पक्षाच्या आमदार यशोमती ठाकूर यांचे वतीने स्वातंत्र्यदिनाच्या होर्डिंगवर इतर राष्ट्रपुरुषामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटो चा समावेश केला नाही हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान असून यातून काँग्रेसचा जातीयवादी




चेहरा पुन्हा उघडकीस आला असल्याचा आरोप वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी केला आहे. तिवसा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून सर्व कार्यकर्त्यांनी पेट्रोलपम्प चौकात एकत्र येत काँग्रेस पक्षाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून निदर्शने दिली. स्वातंत्र्यदिनाच्या हिर्डिंगवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो वगळल्याने आंबेडकरी जनतेमध्ये तीव्र संताप असून हे जाणीवपूर्वक जातीय मानसिकतेमधून केलेले कृत्य आहे. तेव्हा होर्डिंग वर शुभेच्छा देणाऱ्या खासदार बळवंत वानखडे व आमदार यशोमती ठाकूर यांनी समस्त आंबेडकरी जनतेची माफी मागावी अशीही मागणी यावेळी आंबेडकरी कार्यकर्त्यांनी केली. निषेध आंदोलनात यावेळी जेष्ठ नेते सतीश यावले, जिल्हा सदस्य प्रशांत गजभिये, विनय बांबोळे, शैलेश बागडे, अमोल जवंजाळ, राजू शापामोहन,मनीष खरे, बबलू मुंद्रे, दादाराव गडलिंग, गुणवंत ढोणे, सचिन जोगे, महेश दहाट, विनोद खाकसे, धिरेंद्र थोरात, राहुल मनवर, सदानंद घायवट, गोवर्धन मेश्राम, किरण खाकसे,रोषण ढोणे, दिनेश कांबळे, सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# अतिपावसाने खरीप पिकांची वाढ खुंटली; शेतकरी झाले हवालदिल

## जिल्ह्यात नेक परिसरात सततच्या पावसामुळे ओल्या दुष्काळाचे सावट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**मोर्शी /वरुड –** सतत एक महिन्यापासून पावसाने हजेरी लावल्याने शेती पिकांना याचा मोठा फटका बसला असून भातकुली तालुक्यातील खोलापूरसह नावेड, मधलापूर, म्हैसपूर, हरताळा, बोरखडी, हरतोटी, आसरा, खालकोणी, काकरखेडा, समसपूर, देगुरखेडा येथील शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही शेतकऱ्यांनी हातउसने घेत तर काहींनी कर्ज काढून तूर, सोयाबीन, कपाशीची पेरणी केली. मात्र शेतातील पिके बहरत असताना मागील महिन्यापासून सतत होत पावसामुळे पिकांची निंदन, खुरपण, फवारणी, डवरणी रखडल्याने शेतात मोठ्या प्रमाणात तण वाढले आहे. सूर्यप्रकाशाचा अभाव व सततच्या पावसामुळे पिकांवर अळी व किडीचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे पिके पिवळी पडली आहे, तर काही पिके अतिपावसामुळे जळाली आहेत. निसर्गाच्या प्रकोपामुळे शेतातील पिकांचे अतिपावसाने नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना भविष्याची चिंता भेडसावत आहे. कारण ग्रामीण भागातील उपजीविकेचे साधन ही शेती असून, बारा महिन्यांचा लेखाजोखा शेतीवर अवलंबून असतो. या वर्षी सततच्या पावसामुळे ओल्या दुष्काळाच्या सावटाचे संकेत दिसत असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. शेतकऱ्यांना



भेडसावतेय चिंता : या वर्षी मृग नक्षत्र कोरडे गेल्याने पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली. जुलै महिन्यात पावसाने हजेरी लावताच शेतकऱ्यांनी पेरण्या आटोपल्या. पिके शेतात डोलू लागली असता, गेल्या महिनाभरापासून पाऊस हजेरी लावत असल्याने पिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळे यंदा हातात पीक येईल की नाही, याची शेतकऱ्यांना चिंता लागली. पिके पडताहेत पिवळी सततचा पाऊस व ढगाळ वातावरणामुळे पिकांना पुरेशा प्रमाणात सूर्यप्रकाश मिळत नसल्याने पिकांची वाढ खुंटली आहे, तर दुसरीकडे पावसामुळे पिके पिवळी पडत आहेत. काही भागात पिके अति पाण्यामुळे जळू लागली आहेत. सततच्या पावसामुळे मोर्शी/ वरुड भातकुली तालुक्यामध्ये पिकांची वाढ खुंटली आहे.

# 'हर हर महादेव'चा जयघोषात चांदुर बाजार नगरी दुमदुमली

## हिंदु संघटनांच्या वतीने शंभु कावड यात्रेच आयोजन : मुसळधार पावसातही 'बमबम भोले'चा गजर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चांदूर बाजार**

चांदूर बाजार शहरात श्रावण मासच्या तिसऱ्या सोमवारी निघालेल्या शंभू कावड यात्रे मध्ये हर हर महादेवच्या गजरात चांदूर बाजार नगरी दुमदुमली सोमवारी १९ ऑगस्ट रोजी निघालेल्या कावड यात्रेत मोठ्या संखेत भाविक सहभागी झाले होते दरवर्षी श्रावण महिन्यात तिसऱ्या सोमवारी ही कावड यात्रा काढली जाते मागील ३ ते ४ वर्षांपासून कावड यात्रा काढली जात असून देऊरवाडा- काजळी येथील त्रिवेणी संगम नदी पात्रातून जल आणून चांदूर बाजार च्या प्रसिद्ध असेल्या महादेव मंदिरात महादेवाच्या पिंडीवर भाविक जल अर्पण करतात रविवार १८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता चांदूर बाजार येथील धर्मविर संभाजी व्यायाम शाळे पासून ते देऊरवाडा- काजळी येथील त्रिवेणी संगम पर्यंत १२ किलोमीटरचे अंतर गाठून भाविक नदी पात्रातून जल आणतात आणी सकाळी देऊरवाडा- काजळी ते चांदूर बाजार पर्यत १२ किलोमीटरचे अंतर गाठून सोमवरी सकाळी जल अर्पण करतात तिसऱ्या श्रावण सोमवारी १९ ऑगस्ट रोजी चांदूर बाजार शहरात उत्साहात कावाड यात्रेच आयोजन केल यावेळी डीजे च्या तालात भावीक थिरकले शहरातील नागरिकांनी कावड यात्रेच स्वागत केले मुसळधार पाऊसातही भाविकांचा जल्लोष थांबत नव्हता चांदूर बाजार येथील जयस्तंभ चौक,नेताजी चोक,महाराणा प्रताप चौक,गाडगेबाबा नगर,माळी पुरा,सरदार वल्लभाई पटेल चौक या मार्गावरून ही कावड यात्रा काढण्यात आली आणि यांगस्टार चौकातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी खंजिरी वाजवली होती अश्या प्रसिद्ध महादेव मंदिरात भाविकांनी महाआर्ती करून जल अर्पण केले या साठी चांदूर बाजार येथील समस्त हिंदू संघटनांनी परिश्रम घेतले यावेळी कायदा सुव्यवस्था लक्षात घेता चांदूर पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावला होता.

### मुसळधार पावसातही 'बमबम भोले'चा गजर

सोमवारी चांदूर बाजार येथे निघालेल्या शंभू कावड यात्रे मध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली यावेळी कावड यात्रेमध्ये सहभागी असलेल्या भाविकांचा जल्लोष थांबत नव्हता यासह बमबम भोलेच्या गाजरात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# रा.काँ. शरदचंद्र पवार पार्टी तर्फे अंकुश येलगुंडे सन्मानित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

विदर्भ पावर लिफ्टिंग असोसिएशन मध्ये उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल अंकुश येलगुंडे यांचा अमरावती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने सत्कार करण्यात आला.क्रीडा क्षेत्रात आपल्या उत्तुंग कला कौशल्यामुळे नावलौकिक प्राप्त असलेले अंकुश येलगुंडे यांची नुकतीच विदर्भ पावर लिफ्टिंग असोशियन मध्ये उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. पावर लिफ्टिंग मध्ये अमरावतीचे नावलौकिक सर्वत्र निर्माण करणारे अंकुश अलगुंडे हे अमरावतीत आले असता त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष प्रा.हेमंत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शहर युवक अध्यक्ष रोशन कडू यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडा क्षेत्रात चांगले तरुण तयार होऊन त्यांनी अमरावतीचा असाच नावलौकिक वाढवावा याकरिता सर्वांनीच प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत हेमंत देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले. या सन्मानाबद्दल अंकुश येलगुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आभार मानले. यावेळी उमेश क्षार,प्रशांत सोळंके, पंकज कापसे, नितीन चव्हाण, पंकज बाहे , नेहमीचंद पुसतकर,अमित सातपुते,कुशल बोदडे, अर्पित गायकवाड, शैलेश विंचुरकर, लक्ष्मीकांत येळगुंदे, शिवाजी आवटे अंबादास बाहे संजय मळवकर ,प्रवीण घाटोळ, चेतन कुलकर्णी, सारंग ठाकरे, हिमेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

# धाग्यात गुंफलेल्या टिकावू राख्यांना बहिणींची पसंती!

### आज जिल्ह्यात रक्षाबंधन उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

रक्षाबंधनाच्या सणानिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. यंदा वेगवेगळ्या स्वरूपाच्या राख्या उपलब्ध आहेत. रंगीबेरंगी राख्यांनी अमरावतीचे बाजारपेठ सजली आहे रविवारला राखी खरेदीसाठी महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली. यंदा काही विशिष्ट राख्याच्या भावात १० ते १५ टक्के वाढ झाली आहे. विशेष म्हणजे धाग्यात गुंफलेल्या टिकावु राख्यांना पसंती अधिक आहे.

१९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सण आहे. त्यामुळे राख्यांची खरेदी करण्यासाठी बाजारात मोठ्याप्रमाणात गर्दी होत आहे. भाऊ- बहिणीच्या अतूट बंधनाचा दिवस म्हणजे रक्षाबंधन अगदी काही तासांवर येऊन ठेपला आहे. यासाठी बाजारपेठा सज्ज झाल्या आहेत. स्थानिक बाजारपेठांबरोबरच तरुणाईची पसंती असलेली ऑनलाइन बाजारपेठही रक्षाबंधनासाठी नव्या टेंडूच्या राख्या घेऊन तयार आहे. तरुणाईसाठी सध्या स्टाइल, फॅशन महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे राख्याही उपलब्ध आहेत. टिकाऊ आणि स्वदेशी बनावटीच्या राख्या १० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंतच्या किमतीत उपलब्ध आहेत. सोने आणि चांदीचा मुलामा असलेल्या राख्यांच्या विक्रीचे प्रमाण काही वर्षांपासून वाढले आहे. नेहमीप्रमाणेच बांबूपासून तयार केलेल्या राख्यांना मागणी वाढत आहे.

# भगवा सप्ताह उपक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थी सेना (उबाठा) ची जंबो कार्यकारणी घोषित

## सागर देशमुख यांच्या नेतृत्वात शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला शिवबंधन बांधून विद्यार्थी सेनेत प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्रभर भगवा सप्ताह निमित्त विविध प्रकारचे उपक्रम राबवल्या जात आहे याच उपक्रमाच्या एका शृंखलेत अमरावतीमध्ये दिनांक १७/८/२४ रोजी हिंदुरुदयसम्राट सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांनी पेटवलेली खऱ्या हिंदुत्वाची ज्योत नवयुवकांमध्ये पेटवण्यासाठी युवासेना पश्चिम विदर्भ विभागीय सचिव सागर देशमुख यांनी अमरावती जिल्ह्यातील शेकडो महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा विद्यार्थी सेना (उ.बा.ठा.) मध्ये प्रवेश करून घेतला.या कार्यक्रमामध्ये सागर देशमुख यांनी अनेक विषयावर नवयुवकांसमार्गदर्शन केले यासोबतच मा. पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी हाताला काम व मनात राम या हिंदुत्वाची शिकवण विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला त्याचसोबत येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बडनेरा मतदारसंघावर शिवसेनेचा भगवा पुन्हा एकदा फडकवण्याची प्रतिपादन केले व यासाठी आता नवीन युवा चेहरा पक्षाने देण्याची गरज असल्याचेही बोलून दाखवले. यासोबतच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात विद्यार्थ्यांचे प्रश्न नेहमीच तीव्रतेने उचलणारे योगेश रामा सोळंके व प्रथमेश नवरखेले यांची विद्यार्थी सेना जिल्हाप्रमुख शहरी व ग्रामीण या प्रकारे नियुक्ती केली यावेळी त्या ठिकाणी युवासेना जिल्हाप्रमुख श्याम धाने पाटील, स्वराज ठाकरे , पवन दळवी , युवा सेना महानगर प्रमुख राहुल माटोडे उपस्थित होते या नंतर इतर उपस्थित विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्र देऊन अमरावती जिल्हा विद्यार्थी सेनेची जंबो कार्यकारणी घोषित केली ती या प्रकारे - इमरान सैय्यद - उपजिल्हाप्रमुख(अमरावती ) , हर्ष धोटे - उपजिल्हाप्रमुख(बडनेरा), अनिकेत चौरे (उप- जिल्हाप्रमुख ग्रामीण) आयुष कुरळकर ( जिल्हा समन्वयक ग्रामीण) बलराज वाकोडे जिल्हा सरचिटणीस, भाविक कांबळे शहर प्रमुख, कार्तिक डकरे शहर प्रमुख, वेदांत दांडगे शहर सचिव, ऋषिकेश हिंगणकर शहर सचिव, साहिल ढोले उपशहर प्रमुख, पार्थ हरमकर उपशहर प्रमुख, ओम झंझाड शहर समन्वयक, उज्वल संकेपाल शहर सहसचिव, भूषण मेश्राम शहर उपसचिव, योगेश डहाके उपशहर प्रमुख, गजानन जामोदकर उपशहर प्रमुख, शशांक रामटेके विभाग प्रमुख, प्रज्वल दुर्गे विभाग प्रमुख, गणेश निंभोरकर विभाग प्रमुख, राम गुल्हाने विभाग प्रमुख, अभिनव अकोलकर इगनायटेड माईंड्स महाविद्यालय शाखाप्रमुख, शंतनु कातोरे बियाणी महाविद्यालय शाखाप्रमुख , मयूर सोयाम नरसम्मा महाविद्यालय शाखाप्रमुख ,ओम कडू सिपना महाविद्यालय शाखाप्रमुख, तन्मय जिचकार तालुका प्रमुख नांदगाव खंडेश्वर,तुषार मोरे उपतालुका प्रमुख,ओम बनकर उपतालुका प्रमुख, पुष्पक दुगाने तालुका प्रमुख (मोर्शी), हरिओम उमक शहर प्रमुख (मोर्शी), हर्षल तट्टे-शहर समवसक (मोर्शी), श्रेयशओलुकर आयटी आय प्रमुख, तन्मय जिचकार नांदगाँव तालुका प्रमुखओम बनकर नांदगाँव शहर प्रमुख आकाश घवळे उपशहर प्रमुख मंथन कोल्हे उपतालुका प्रमुख सूरज नेवारे उपतालुक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्यावर बेहिशोबी मालमत्ताचे आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अकोला**

अमरावती परिक्षेत्राच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून शिवसेना ठाकरे गटाचे बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांची चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आता 'एसीबी'ने आमदारांचे पाल्य शिक्षण घेणार्या शाळेच्या मुख्याध्यापकांना नोटीस बजावून त्यांच्या शैक्षणिक खर्चाची माहिती मागवली. हे पत्र समाजमाध्यमांवर प्रसारित झाले असून त्यावरून सरकारवर टीका केली जात आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्यावर बेहिशोबी मालमत्ताचे आरोप करण्यात आले आहे. या प्रकरणाची गेल्या दोन वर्षांपासून चौकशी सुरू आहे. अमरावती एसीबीकडून बेहिशेबी मालमत्ताच्या आरोप प्रकरणात १७ जानेवारी रोजी अमरावती येथील कार्यालयात आमदार नितीन देशमुख यांची चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणातील हालचाली मंदावल्या होत्या. दरम्यान, आता पुन्हा एकदा बेहिशोबी मालमत्ता प्रकरणात आमदार नितीन देशमुख यांच्या भोवती चौकशीचा समेमिरा सुरू झाला. निवडणुकीच्या तोंडावर एसीबीकडून सखोल चौकशी करण्यात येत असल्याने आमदार नितीन देशमुख यांच्या अडचणीत



चांगलीच वाढ झाली. अमरावती एसीबीकडून आमदार देशमुख यांच्या कुटुंबाची देखील माहिती घेऊन चौकशी केली जात आहे.

अमरावती परिक्षेत्राच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस अधीक्षक अनिल पवार यांनी ४ जुलैला अकोल्यातील प्रभात किड्स स्कूलच्या मुख्यध्यापकांना पत्र पाठवून आमदार नितीन देशमुख यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काची माहिती मागवली. बाळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन देशमुख यांची उघड चौकशी केली जात आहे. त्यांचे पाल्य पृथ्वी देशमुख व जान्हवी देशमुख अनुक्रमे १० वी आणि आठव्या वर्गात शिकतात. आमदार नितीन देशमुख यांनी मुलांच्या शिक्षणावर शाळेत प्रवेश घेतल्यापासून आतापर्यंत आकारण्यात आलेल्या संपूर्ण शैक्षणिक खर्चाची माहिती एसीबी कार्यालयात तत्काळ सादर करावी, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. निवडणुकीच्या तोंडावर आमदार नितीन देशमुख एसीबीच्या रडारवर आले आहेत. या प्रकरणावरून शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी जाणीवपूर्वक पोलिसांचा ससेमिरा लावण्यात आल्याचा आरोप केला आहे.

# खाटीक समाज परिवर्तन संघटनेतर्फे ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा

### खाटीक समाज भवनाचे भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

खाटीक समाज परिवर्तन संघटना अमरावती,सर्व शाखा,महिला कार्यकारिणी शाखा यांच्या वतीने जुना बाय पास,बडनेरा रोड येथे समाजा साठी मिळालेल्या जागेवर समाज बांधवांच्या उपस्थितीत ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी माजी सैनिक श्री शालिकरामजी पारवेकर समाज बांधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी संघटनेचे अध्यक्ष नंदकिशोर हरणे,कृष्णरावजी पारडे माजी प्राचार्य,प्रा. डॉ.ताराचंद्र कंटाळे,जि.प.सदस्य डोईफोडे,माजी नगरसेविका वंदनाताई हरणे,महिला अध्यक्ष प्रिया नेहर यांची विशेष उपस्थिती होती.ध्वजारोहणानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक आ.रवी राणा बडनेरा मतदारसंघ यांच्या हस्ते प्रस्तावित खाटीक समाज भवनाचे भूमिपूजन,फलक अनावरण तसेच कविवर्य कृष्णरावजी पारडे यांच्या काव्यपुष्प पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी सूत्रसंचालन सचिव मोहन नेहर यांनी केले तर प्रा.डॉ.ताराचंद कंटाळे यांनी आपले विचार व्यक्त करून समाजासाठी जागा व निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल रवी राणा यांचे आभार मानले,आपल्या भाषणात रवी राणा यांनी खाटीक समाजाच्या विद्यार्थ्यां करिता वसतिगृहासाठी अजूनही निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन दिले.याप्रसंगी संजय माहुरकर, डॉ.श्रीकृष्ण कंटाळे,डॉ.विठ्ठल कंठाळे ,विजय हरणे,माणिक नेहर,रामेश्वर माहुरकर,सतीश माहुरे,गजानन कंटाळे,भास्कर माहुरकर,सुभाष लोणारे,प्रा मनोहर पारवे,सुरेश माहुरे, सुधाकर कंटाळे,राजकुमार दुर्गे,शालीकराम कंटाळे,संतोष हरणे,सतीश हरणे,संतोष रावेकर, धनंजय लोणारे,उमेश ढोणे, महिला प्रतिनिधी नीता धनाडे, अरुणा माहुरे,सरिता मदने, अर्चना कंटाळे,सोनल धनाडे,शारदा पारवे,रंजना पारवे,मीना कंटाळे,सुमन लोणारे,संगीता दुर्गे,लता डोळे,प्रतिभा कंटाळे,कमला माहुरे,प्रियंका मंडवे, आचल गुजर,नीलिमा डोफे,संगीता पारवे,नम्रता पारवे,अर्चना पारवे,सारिका कंटाळे,प्रीती पारवे,शीतल पारवे तसेच समाज बांधव यांची उपस्थिती होती हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संघटनेच्या बेलपुरा, महाजनपुरा,बडनेरा, रिद्धपुर, पूर्णानगर, नांदेड ब.,मोर्शी,वाठोडा शुकलेश्वर,धामणगाव गढी, अचलपूर ईत्यादी शाखांचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर 'बोमा' पद्धतीने वन्यप्राण्यांचे 'ट्रॅप'; राज्यात पहिलाच प्रयोग

## विधानसभा आचार संहितेपूर्वीच विमानांचे 'टेक ऑफ, लँडिंग' ची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

अमरावती विभागासाठी मैलाचा दगड ठरू पाहणाऱ्या बेलोरा विमानतळाची विकासकामे ही अंतिम टप्प्यात आली आहेत. मात्र, येत्या काळात विमानांचे 'टेक ऑफ, लँडिंग'साठी अडसर ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना विमानतळ परिसरातून बाहेर काढण्यासाठी 'बोमा' पद्धतीचा वापर केला जात आहे. त्याकरिता वन विभागाने विमानतळाच्या परिसरात कार्यवाही सुरू केली असून, लवकरच वन्यप्राण्यांचे 'ट्रॅप' करून त्यांना त्यांच्या अधिवासात सुरक्षितपणे पाठविले जाणार आहे. वन्यप्राणी रेस्क्यू करण्यासाठी 'बोमा' पद्धत ही राज्यात पहिल्यांदाच अमरावतीत वापरली जात आहे.

बहुप्रतीक्षित बेलोरा विमानतळाची विविध विकासकामे वेगाने सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच बेलोरा विमानतळाचे लोकार्पण करण्याची राज्य सरकारने तयारी चालविली आहे. एटीआर-७२ आसनी विमान सेवा पहिल्या टप्प्यात सुरू होणार आहे. अमरावती ते मुंबई, अमरावती ते पुणे या विमानसेवेसाठी राज्य शासनाने एका खासगी कंपनीसोबत करारदेखील केला आहे. मात्र, बेलोरा विमानतळाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वन्यप्राणी असल्याने ते भविष्यात विमानसेवेसाठी धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या निर्देशानुसार बेलोरा विमानतळ परिसरातून वन्यप्राणी पकडण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत वापरल्या जाणारी 'बोमा' पद्धत अवलंबवली जात आहे.



वन विभागाकडून वन्यप्राणी पकडण्यासाठी बेलोरा विमानतळ परिसरात पहिल्यांदाच 'बोमा' पद्धत अवलंबविली जात आहे. तयारी जोरात सुरू असून, मध्य प्रदेशातून वाहन आणले जाणार आहे. या पद्धतीमुळे लवकरच विमानतळ परिसर वन्यप्राणीमुक्त होणार आहे.

**–ज्योती पवार, सहायक वनसंरक्षक, अमरावती.**

**काय आहे 'बोमा' पद्धत**

वन्यप्राणी जेरबंद करण्यासाठी 'बोमा' ही पद्धत वापरली जाते. यात वाय आकाराचे कुंपण तयार केले जाते. या भागाला पूर्णत: नैसर्गिक लूक असतो. वन्यप्राणी सुरक्षितपणे रेस्क्यू होण्यासाठी एक मोठा रॅम्प तयार केला जातो. तीनही बाजूंनी कप्पे तयार करून एका बाजूचा निमुळता आकार राहत असून, त्याच भागात वाहन उभे केले जाते. वाय प्रकारचा आकार तीनही बाजूंनी हिरव्या नेटद्वारे वेढला जातो. जंगलाच्या बाजूने वन्यप्राणी हाकलत आणून रॅम्पच्या निमुळत्या भागात लावण्यात आलेल्या अद्ययावत वाहनात हे वन्यप्राणी सुरक्षितपणे रेस्क्यू केले जातात. यापूर्वी मध्य प्रदेशातील पेंच अभयारण्यात ही पद्धत वापरली गेली आहे.

# ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता

## सावधान ! बीएसएनएलच्या नावाने ग्राहकांना येत आहेत फेक संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**

तालुक्यातील मोबाइल ग्राहकांना केवायसी नोंदणी करण्याकरिता बीएसएनएलच्या नावाने मोबाइल बंद होईल, अशा प्रकारचे फेक संदेश पाठविले जात असल्याने ग्राहक गोंधळले आहेत. यातून फसवणूक होण्याची शक्यता असून, या दृष्टिकोनातून नागरिकांनी सावध राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रात असलेल्या अनेक तालुक्यात मोबाइल ग्राहकांना बीएसएनएलद्वारे मोबाइलवर फेक संदेश पाठविले जात आहेत. मोबाइलच्या व्हॉट्सॲप नंबरला बीएसएनएल ऑफिसच्या पत्रामध्ये नोटीसद्वारे केवायसी करणे अनिवार्य आहे अन्यथा आपला मोबाइल क्रमांक २४ तासांत बंद करण्यात येईल, असा संदेश पाठविण्यात येत आहे.




मोबाइलचे व्हॉट्सॲपवर आलेल्या नोटीस पत्रामध्ये राहुल शर्मा या नावाच्या अधिकाऱ्याचा मोबाइल क्रमांक दिलेला आहे. ग्राहकांना पाठविलेल्या मोबाइलवर असलेल्या पत्रामध्ये प्रत्येकाला राहुल शर्माचे वेगवेगळे मोबाइल क्रमांक आढळून आले आहेत.

अशा प्रकारे येणारे संदेश मोबाइल ग्राहकांना फसवणुकीचे असून, बीएसएनएलच्या नावाने व सत्यमेव जयते लिहिलेले पत्र अधिकाऱ्याच्या नंबरसह ग्राहकांना पाठविले जात आहेत. मात्र, हा संदेश फेक असल्याचे म्हटले जात आहे.मोबाइलवर आलेला संदेश हा फेक असून, ग्राहकांनी ओटीपी व आपला मोबाइल नंबर देऊन संपर्कात येऊ नये. मोबाइलद्वारे रिप्लाय व रिस्पॉन्स कोणालाही देऊ नये.असे आवाहन बीएसएनएल तर्फे करण्यात आले आहे.

**बीएसएनएल अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे**

ग्राहकांचा मोबाइल नंबर बंद होईल, या दृष्टीने केवायसी नोंदणी अनिवार्य करण्याकरिता ग्राहक भटकंती करत आहेत, मोबाइलवर आलेल्या संदेशामुळे फसवणूक होणार नाही, याकरिता अधिकाऱ्यांनी आलेल्या संदेशानुसार दिलेल्या माहितीच्या मोबाइल क्रमांकावर अधिकाऱ्यांनी संपर्क साधून योग्य कार्यवाही करावी, अशी मोबाइल ग्राहकांची मागणी आहे.

# भीक मागतात शहरातील चौकात, बसस्थानकात राहतात आलिशान घरांमध्ये : राजकमल चौकात नागरिकांना सर्वाधिक त्रास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

शहरामध्ये रस्त्यांवर भीक मागणारे काही भिकारी लखपती असल्याचे अनेकवेळा ऐकायला मिळते. अशीच स्थिती अमरावती शहरातील राजकमल चौक, बसस्थानक, रेल्वेस्थानक, तसेच वर्दळीच्या रसत्यावर भीक मागणाऱ्या काहींची आहे. सहज जगता येत असतानाही अनेकजण भीक मागून पैसा कमवितात. गंभीर बाब म्हणजे सहानुभूती मिळावी, यासाठी काही जण लहान मुलांना भिकेला लावत असल्याचे चित्र आहे.

भिक्षा प्रतिबंधक कायदा १९७९ नुसार भीक



मागणे हा गुन्हा आहे. एखादी व्यक्ती भीक मागताना आढळल्यास त्याला पोलिसांनी न्यायालयासमक्ष हजर केले जाते. न्यायालयाच्या आदेशाने संबंधित व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. मात्र, भीक मागणाऱ्या व्यक्तींवर प्रशासकीय यंत्रणेकडून कुठलीच कार्यवाही केली जात नाही. परिणामी, भीक मागणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत मागील काही वर्षांत प्रचंड वाढ झाली आहे. विशेषतः राजकमल चौक,बस स्थानक आणि रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या मागे कायम लागलेली असते. काहींची स्थिती नसल्याने नाइलाजास्तवइजालास्वत भिक्षा मागावी लागत आहे. तर काही हातपाय शाबुत असताना देखील हा व्यवसाय करीत आहे.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राखी पाठवून राष्ट्रवादीच्या महिलांनी पूर्ण केले बहिणीचे कर्तव्य

## इर्विन चौकात राष्ट्रवादीच्या नेत्या सुरेखा ठाकरे यांच्या नेतृत्वात रक्षाबंधनाचा कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला पंधराशे रुपयांची योजना सुरु करून भावाचे कर्तव्य पूर्ण करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिलांनी अमरावती जिल्ह्यातून राख्या पाठवून बहिणीचे कर्तव्य पूर्ण केले आहे, राष्ट्रवादीच्या नेत्या तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुरेखा ठाकरे यांच्या नेतृत्वात हा रक्षाबंधनाचा कार्यक्रम इर्विन चौक येथे आयोजित करण्यात आला होता, यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकरिता एक मोठी राखी तयार करण्यात आली होती, तसेच यावेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना देखील राख्या बांधण्यात आल्या,

राज्य शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु करून महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे काम केलेले आहे, इतकेच नव्हे तर याची अंमलबजावणी रक्षाबंधनाच्या पूर्वीच करीत प्रत्येक महिलांच्या खात्यात तीन हजार रुपयांची रक्कम टाकलेली आहे, त्यामुळे जिल्ह्यात एक आनंदाची लाट उसळलेली आहे, महिलांना आर्थिक सक्षम बनविणाऱ्या भावाप्रती आपल्या बहिणीचे कर्तव्य पूर्ण करण्याकरिता सोमवारी रक्षाबंधनाच्या दिवशी इर्विन चौक येथे राष्ट्रवादीच्या नेत्या सुरेखा ठाकरे यांच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या करीता भव्य दिव्य आकर्षक अशी राखी तयार करण्यात आली होती ही आकर्षक राखी सर्वांचे लक्ष आय कडे वेधून घेत होती.कार्यक्रमा नंतर ही राखी त्यांना पाठविण्यात आली, तसेच नागरिकांना व प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना देखील यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिलांनी राख्या बांधून रक्षाबंधनाचा उत्सव साजरा केला.यावेळी महिला जिल्हाध्यक्ष शोभना देशमुख, कार्याध्यक्ष सुषमा बर्वे, उपाध्यक्ष नर्गिस अली ज्योती वानखडें, सारिका बोरकर, माधुरी शिंगारे, रंजना पाथरे, वनिता धर्मपाल, साक्षी बेले, अनिता गावंडे, वंदना ठाकरे,कल्पना ढोके, यास्मिन अली, सुषमा बीसणे, रेखा धर्माळे, रूपाली भुजाडे, मीरा वानखडे, मुक्ता तेलकडे कांचन मुरके, कल्पना खांडे, अनिता सुळे, रेखा मुळे, रेखा पांडव, रसिका बोंडे, शुभांगी महात्मे आदींची उपस्थिती होती.

# चांदुर बाजार तालुक्यात ढगफुटी सदृष्य पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## थुगाव, माधान गावामध्ये जोरदार पावसाने घरा मध्ये शिरले पाणी,पिके आली पाण्याखाली : तात्काळ पंचनामे करण्याचे ग्रामस्थांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९चांदूर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यातील थुगाव, माधान , येथील गोर गरीब शेतकरी शेतमजूर परिवार ढगफुटी मुसळधार पाऊससाने मोठ्या प्रमाणावर संकटामध्ये सापडला आहे. चांदूर बाजार तालुक्यात माधान, थुगाव भागात अचानक ढगफुटी झाल्याने पावसाच्या पाण्याने कहर केला असून गोर गरीब परिवार यांच्या घरा मध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे शेतकऱ्यांच्या कपाशी, तूर, सोयाबीन, संत्रा या सर्व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आधी शेतकरी पाऊस नाही म्हणून चिंतेत होते, मात्र आता अतिवृष्टीमुळे नवे संकट उभे झाले आहे. माधान, थुगाव या गावातील शेतकऱ्यांच्या्या शेतातील संत्रा ,कपाशी, सोयाबीन पीक पावसाच्या पाण्याखाली आले असून अनेक भागात पीक वाहून गेले आहे सलग २५ मीट सुरू असलेल्या पावसाने नदी, नाले भरून वाहत आहे. त्या मुळे काही गावामध्ये पाणी शिरले आहे त्यात काही भागात शेतकरी संकटात आहे अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी काय करावे, हे सुचेनासे झाले. आहे चांदूर बाजार येथील तहसीलदार प्रथमेश मोहोड यांनी अधिकाऱ्यांना नुकसानाचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे. मात्र अद्यापही प्रशासनाचा कुठलाही अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर पोचला नाही त्यामुळे शेतकऱ्यांसह नुकसान झालेल्या नागरिकांना शासकीय पातळीवर मदत मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे. या करिता माधान , थुगाव पिपरी गावातील नागरिकांनी तात्काळ पंचनामे करून मदत देण्यात यावी अशी मागणी केली आहे न झाल्यास शेतामध्ये साचलेल्या पाण्यामध्ये झोपून आंदोलन करू असा मोठा इशारा गावातील नागरिकांनी दिला आहे तर गोर गरीब परिवार यांच्या घरात पाणी गेले आहे त्यांचे सुद्धा तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी गोर गरीब गरजू परिवारातर्फे करण्यात येत आहे

### नदी, नाल्यांना पूर

तालुक्यात माधान व थुगाव येथे ढगफुटी पाऊस झाल्याने नदी, नाले ओसंडूत वाहत आहेत. त्या मुळे नदी नाल्याचे पाणी गावामध्ये घुसले आहे त्या मध्ये अनेक नाल्या बाजूला असलेल्या घरा मध्ये पाणी गेले आहे तर काही ठिकाणीरस्त्यांचे सततच्या पावसामुळे नुकसान झाले आहे. तर काही ठिकाणी मार्गावरील पूल क्षतिग्रस्त झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेती खरडून गेली आहे.मोठे नुकसान झाले आहे माझ्या घरात पाणी गेले आहे या गोष्टी ची माधान ग्रामपंचायत व प्रशासन यांनी दखल घेऊन तात्काळ पंचनामे करून मला आर्थिक मदत देण्यात यावी

**दिनेश खडसे माधान**

चांदुर बाजार तालुक्यातील ढगफुटी ने थुगाव पिपरी संत्राबागांचे नुकसान मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन त्याचा फटका तालुक्यातील संत्रा उत्पादकांनाहीबसला आहे. प्रचंड मेहनतीने उभ्या केलेल्या बागांमधील कलमा अतिवृष्टीमुळे कोलमडल्या आहेत. त्यामुळे संत्रा बागायतदार चिंतेत आहेत. संत्रा गळण्याला सुरुवात झाली आहे पिके पाण्याखाली आहे प्रशासन व कृषी अधिकारी यांनी तात्काळ दखल घेणे गरजेचे आहे व नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ पंचनामे करून मदत देण्यात यावी नाही शेतीमध्ये आंदोलन करू

**शेतकरी / सूरज अरविंद लंगोटे थुगाव पिंपरी**

# आमदार रवी राणांच्या कार्यालयात रक्षा बंधन उत्सव साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**







संपूर्ण देशात आज रक्षाबंधन साजरा केला जात आहे. वेगवेगळ्या स्तरावर आज रक्षाबंधन साजरा केला जातो. दरवर्षी प्रमाणे यंदाही युवा स्वाभिमान पार्टीद्वारा अमरावतीत भव्य रक्षाबंधन कार्यक्रम आमदार रवी राणा यांच्या मुख्य कार्यालयात साजरी करण्यात आला. यावेळी आमदार रवी राणा यांना जिल्ह्यातील शेकडो महिलांनी राख्या बांधल्या.या वेळी आ.राणा म्हणाले कि बहिणीसाठी भावाने नेहमीच उभे राहावे त्यांच्या सुख दुःखात सहभागी झाले पाहिजे बहिणींनी राखी बांधल्यामुळे मला एक ऊर्जा मिळते तसेच महायुतीच्या सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. हि सगळ्यात चांगली योजना आहे बहिणींमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण आहे त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मतदान या बहिणी करणार आहे. पुढील काळात महायुतीचे सरकार आल्यानंतर १५००रु.चे ३०००रु करण्यात यावे अशी मागणी असल्याचे आ. रवी राणा म्हणालेत.अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणांनी आज आपल्या सुरक्षा रक्षकांसोबत रक्षाबंधनाचा सण साजरा केला. महाविकास आघाडीविरोधात रान उठवणाऱ्या नवनीत राणांना केंद्र सरकारने वाय प्लस दर्जाची सुरक्षा पुरवली आहे. आपल्या याच सुरक्षा रक्षकांना राखी बांधून खासदार राणांनी आजचा हा सण आनंदाने साजरा केला